माहितीचा अधिकार

# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे यांचे समोरील माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८ अन्वये दाखल झालेला तक्रार अर्ज

क्र.तक्रार रामाआ- ४७१ / २०२२ / पुणे

राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत,
विधान भवना समोर, पुणे - १

| अपिलार्थी | उत्तरवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी तथा | प्रथम अपिलीय अधिकारी तथा |
| राहुल चंद्रकांत भारती | सहाय्यक संचालक प्रा. , प्राथमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे ०१ | सह संचालक, प्राथमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे ०१ |

**तक्रार अर्ज सुनावणी दिनांक- ०४-१०-२०२४**

तक्रारदार यांनी आयोगाकडे दि.१०/१०/२०२२ रोजी तक्रार अर्ज दाखल केला असून त्यामध्ये आयोगोन दिलेल्या द्वितीय अपिल आदेशानंतरही माहिती दिलेली नाही, अशी तक्रार केलेली आहे.

आयोजित सुनावणीस तक्रारदार व उत्तरवादी गैरहजर आहेत. तसेच आयोगाने यापूर्वी आयोजीत केलेल्या दि.१४/१२/२०२३ रोजीच्या सुनावणीस तक्रारदार कोणतीही पूर्व सूचना न देता गैरहजर राहिलेले आहेत.

उपलब्ध कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, आयोगाने द्वितीय अपिल क्र.९५८/२०२२/पुणे मध्ये दि.११/०७/२०२३ रोजी अपिलार्थीस माहिती पुरविण्याचे आदेशीत केले होते. सदर आदेशाची अंमलबजावणी झाली नाही, अशी अपिलार्थीने तक्रार केलेली आहे.

सदर तक्रार अर्जाच्या अनुषंगाने दोन वेळा सुनावणी ठेवूनही अपिलार्थी आयोगास कोणतीही पूर्व सूचना न देता गैरहजर राहिलेले आहेत. यावरुन त्यांना सदर तक्रार चालविण्यात स्वारस्य नसल्याचे दिसून येते. त्यामुळे त्यांची तक्रार निकाली काढण्यास पात्र आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

अर्जदाराचा तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

(समीर सहाय)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ पुणे.

जावक क्र. 5906/2024 दिनांक - 15/10/2024